20 AUG 2026 सिंधुदुर्ग समाचार
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात एसबीआय ई-पे सेवेला प्रारंभ



**कोल्हापूर/प्रतिनिधी :** शिवाजी विद्यापीठाच्या आर्थिक व्यवहारांना अधिक गतिमान, सुरक्षित, पारदर्शक आणि कार्यक्षम करण्याच्या दृष्टीने एसबीआय ई-पे (SBIePay) – एफएएस (FAS) एकात्मिक व्हाउचर पेमेंट प्रणालीचे आज कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.

स्टेट बँक ऑफ इंडिया आणि कॉम्पसर्व्ह कन्सल्टंट्स यांच्या सहकार्याने विकसित करण्यात आलेल्या या ऑनलाइन पेमेंट प्रणालीमुळे विद्यापीठाच्या आर्थिक व्यवहारांमध्ये धनादेशाधारित पारंपरिक पद्धतीऐवजी थेट डिजिटल देयक प्रणालीची अंमलबजावणी होणार आहे. सध्या ही प्रणाली प्रायोगिक तत्त्वावर (Pilot Basis) सुरू करण्यात आली असून, तिचे यश आणि तांत्रिक बाजू तपासून लवकरच ती टप्प्याटप्प्याने लागू केली जाणार आहे.

कुलगुरू डॉ. कामत यांनी विद्यापीठाच्या आर्थिक व्यवस्थापनात डिजिटल तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करणे ही काळाची गरज असल्याचे सांगितले. त्यानुसार आर्थिक व्यवहार अधिक वेगवान, पारदर्शक आणि उत्तरदायी करण्यासाठी आधुनिक डिजिटल प्रणालींचा स्वीकार आवश्यक असून, एसबीआय ई-पेच्या माध्यमातून विद्यापीठाच्या आर्थिक व्यवहारांना अधिक कार्यक्षम दिशा मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. ही प्रणाली केवळ देयकाची पद्धत बदलणारी नसून विद्यापीठाच्या एकूण डिजिटल परिवर्तनाच्या प्रवासातील हे महत्त्वपूर्ण पाऊल असल्याचे त्यांनी नमूद केले.

**धनादेशापासून थेट डिजिटल हस्तांतरणापर्यंत**

सध्या व्हाउचर तयार करणे, त्याची तपासणी व मंजुरी, धनादेश तयार करणे, अधिकृत स्वाक्षरी, बँकेत सादरीकरण, क्लिअरिंग, रक्कम जमा होणे आणि त्यानंतर मॅन्युअल ताळमेळ अशा अनेक टप्प्यांतून देयक प्रक्रिया पूर्ण होते. या प्रक्रियेत वेळखाऊ कामकाज, कागदपत्रांचा मोठ्या प्रमाणावर वापर, मॅन्युअल कामाचा भार, क्लिअरिंगला लागणारा वेळ आणि ताळमेळाचे अतिरिक्त काम अशा अडचणी येतात.

नव्या 'एसबीआय ई-पे – एफएएस' एकात्मिक प्रणालीमध्ये एफएएसमध्ये व्हाउचर तयार झाल्यानंतर त्याची मेकर आणि चेकर पातळीवर तपासणी व मंजुरी केली जाते. त्यानंतर एसबीआय ई-पेकडे देयक सूचना पाठविली जाते. एसबीआय ई-पे मार्फत देयक प्रक्रिया पूर्ण होऊन लाभार्थ्याच्या बँक खात्यात थेट इलेक्ट्रॉनिक हस्तांतरण केले जाते. व्यवहार पूर्ण झाल्यानंतर युटीआर क्रमांकाद्वारे त्याची पुष्टी होते आणि एफएएसमध्ये व्यवहाराची स्थिती अद्ययावत केली जाते. त्यानंतर लेखांकन, ताळमेळ, डिजिटल नोंद आणि एमआयएस अहवालाची प्रक्रिया सुलभ होते.

**जलद, सुरक्षित आणि पारदर्शक व्यवहार**

एसबीआय ई-पे प्रणालीमुळे देयक प्रक्रिया अधिक जलद होण्याबरोबरच धनादेशमुक्त आर्थिक व्यवहार शक्य होणार आहेत. लाभार्थ्याला थेट रक्कम हस्तांतरित होत असल्याने प्रक्रियेत सुलभता येईल. प्रत्येक व्यवहाराचा युटीआर क्रमांक उपलब्ध असल्याने व्यवहाराचा मागोवा घेणे सोपे होणार असून आर्थिक व्यवहारांच्या नोंदी अधिक सक्षमपणे जतन करता येतील. तसेच बँक ताळमेळाची प्रक्रिया सुलभ होऊन मॅन्युअल कामाचा भार कमी होईल.

या प्रणालीमुळे आर्थिक व्यवहारांवर अधिक मजबूत नियंत्रण, डिजिटल ऑडिट ट्रेल, एमआयएस व स्थिती अहवालाची सुविधा उपलब्ध होणार आहे. परिणामी विद्यापीठाच्या आर्थिक व्यवस्थापनात पारदर्शकता आणि कार्यक्षमता वाढण्यास मदत होईल.

**ताळमेळ आणि लेखापरीक्षण अधिक सुलभ**

जुन्या धनादेश पद्धतीच्या तुलनेत नव्या प्रणालीमध्ये डिजिटल देयक सूचना, थेट इलेक्ट्रॉनिक हस्तांतरण, कागदपत्रांचा कमी वापर, सुलभ किंवा स्वयंचलित ताळमेळ आणि युटीआर आधारित डिजिटल ऑडिट ट्रेल ही वैशिष्ट्ये उपलब्ध आहेत. त्यामुळे व्यवहारांचा मागोवा अधिक प्रभावीपणे घेता येणार असून लेखापरीक्षणासाठी आवश्यक डिजिटल नोंदीही उपलब्ध राहतील.

**डिजिटल आर्थिक व्यवस्थापनाची नवी सुरुवात**

व्हाउचर तयार करणे, तपासणी व मंजुरी, एसबीआय ई-पेकडे देयक सूचना, थेट बँक हस्तांतरण आणि त्यानंतर एफएएसमध्ये स्थिती अद्ययावत करणे अशी एकात्मिक प्रक्रिया या प्रणालीद्वारे कार्यान्वित होणार आहे. त्यामुळे विद्यापीठाच्या आर्थिक व्यवस्थापनात जलद, सुरक्षित, पारदर्शक, एकात्मिक आणि कार्यक्षम अशा डिजिटल प्रक्रियेची सुरुवात झाली आहे.

यावेळी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. विलास शिंदे उपस्थित होते. वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. लेखा परीक्षक दुर्गाली गायकवाड आणि अंतर्गत हिशेब तपासनीस अजित चौगुले यांनी एसबीआय ई-पे प्रणालीचे सादरीकरण केले. स्टेट बँक ऑफ इंडियाचे विभागीय व्यवस्थापक निशांतकुमार जयस्वाल, मुख्य व्यवस्थापक संदीप कुमार, पंकज पाटील, व्यवस्थापक ओवी सहस्त्रबुद्धे, उपव्यवस्थापक संदीप बुचडे, कॉम्पसर्व्ह कन्सल्टंट प्रा.लि., कोल्हापूरचे विनय गुप्ते, शशिकांत खोत यांच्यासह विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सन्माननीय सदस्य आणि अधिविभागांचे प्रमुख मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 AUG 2026
सिंधुदुर्ग समाचार

# शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांना लोकशिक्षक बाबा भारती जीवन गौरव पुरस्कार जाहीर

**कोल्हापूर/प्रतिनिधी :**

पुणे येथील लोकशिक्षक बाबा भारती प्रतिष्ठानच्या वतीने देण्यात येणारा 'लोकशिक्षक बाबा भारती जीवन गौरव पुरस्कार' शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांना जाहीर झाला आहे. प्रतिष्ठानचे अध्यक्ष महेंद्र भारती व संयोजक डॉ. पांडुरंग भोसले यांनी आज ही घोषणा केली.

ज्येष्ठ साहित्यिक व अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान सोहळा शुक्रवारी (ता. २१) सकाळी ११ वाजता येथील राजर्षी शाहू स्मारक भवनात होणार आहे.

त्याचप्रमाणे प्रतिष्ठानच्या वतीने देण्यात येणारा लोकशिक्षक बाबा भारती शिक्षक प्रतिभा पुरस्कार निपाणी येथील ज्येष्ठ समाजशास्त्रज्ञ डॉ. एन. डी. जत्राटकर आणि ईश्वरपूर येथील ज्येष्ठ पत्रकार डॉ. संजय थोरात यांना याच समारंभात प्रदान करण्यात येणार आहे. पाली-मराठी भाषेचे पहिले शब्दकोशकार बाबा भारती यांच्या स्मरणार्थ सदर पुरस्कार देण्यात येतात.

या कार्यक्रमास शिवाजी विद्यापीठाच्या मराठी अधिविभागाचे प्रमुख डॉ. रणधीर शिंदे आणि जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहतील.

साहित्य परिषदेचे पुरुषोत्तम सदाफुले, आनंदा कांबळे, विजय कांबळे, रविंद्र भारती, निमिषा भारती, शार्दुल भारती आदी या कार्यक्रमाचे संयोजन करीत आहेत.

जनसंपर्क कक्ष

20 AUG 2026 वार्ता संग्राम शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पुणे येथील लोकशिक्षक बाबा भारती प्रतिष्ठानचे पुरस्कार जाहीर

## कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांना जीवन गौरव तर डॉ.एन.डी.जत्राटकर यांना शिक्षक प्रतिभा पुरस्कार जाहीर



कुलगुरू डॉ.राजनीश कामत



डॉ.एन.डी.जत्राटकर



डॉ.संजय थोरात

कोल्हापूर /प्रतिनिधी : पुणे येथील लोकशिक्षक बाबा भारती प्रतिष्ठानच्या वतीने पाली-मराठी भाषेचे पहिले शब्दकोशकार बाबा भारती यांच्या स्मरणार्थ देण्यात येणारा लोकशिक्षक बाबा भारती जीवन गौरव पुरस्कार शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांना जाहीर झाला आहे.तर शिक्षक प्रतिभा पुरस्कार निपाणी येथील ज्येष्ठ समाजशास्त्रज्ञ डॉ. एन. डी. जत्राटकर आणि ईश्वरपूर येथील ज्येष्ठ पत्रकार डॉ.संजय थोरात यांना प्रदान करण्यात येणार असल्याची घोषणा प्रतिष्ठानचे अध्यक्ष महेंद्र भारती व संयोजक डॉ. पांडुरंग भोसले यांनी केली.

पुरस्कार प्रदान सोहळा शुक्रवार दि.२१ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता राजर्षी शाहू स्मारक भवन येथे आयोजित करण्यात आला असून ज्येष्ठ साहित्यिक व अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमास शिवाजी विद्यापीठाच्या मराठी अधिविभागाचे प्रमुख डॉ. रणधीर शिंदे आणि जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत.

कार्यक्रमाचे संयोजन साहित्य परिषदेचे पुरुषोत्तम सदाफुले,आनंदा कांबळे, विजय कांबळे, रविंद्र भारती, निमिषा भारती, शार्दुल भारती आदी करीत आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 AUG 2026
तरूण भारत

# शिवाजी विद्यापीठात नशामुक्ती जनजागृती उपक्रम

**कोल्हापूर :** समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद आणि राष्ट्रीय सेवा योजना, शिवाजी विद्यापीठांच्या संयुक्त विद्यमाने 'नशामुक्त कोल्हापूर' अभियानांतर्गत सोमवारी शिवाजी विद्यापीठात व्यसनमुक्ती जनजागृती उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांसाठी रील मेकिंग व निबंध स्पर्धा घेण्यात आल्या. स्पर्धेतील विजेत्यांना समाज कल्याण समिती सभापती श्रद्धा गायकवाड यांच्या हस्ते नशामुक्ती चॅम्पियन ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले. यावेळी डॉ. संतोष निंबाळकर यांचे विद्यार्थ्यांना व्यसनांचे दुष्परिणाम आणि व्यसनमुक्तीबाबत व्याख्यान झाले. कार्यक्रमास शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. कबीर खराडे तसेच राष्ट्रीय विकास विभागाचे संचालक डॉ. एस. जी. घाणे उपस्थित होते. जिल्हा समाज कल्याण अधिकारी राजेंद्र माने यांच्या मार्गदर्शनाखाली याचे नियोजन केले होते. शिवाजी विद्यापीठाचे कार्यक्रम अधिकारी डॉ. अभिजित गाताडे यांनी आभार मानले. विद्यार्थ्यांनी व्यसनमुक्त समाजाच्या निर्मितीसाठी जनजागृतीत सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन करण्यात आले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

20 AUG 2026

जनप्रवास

# स्पर्धा परीक्षांसाठी अभ्यासाचे नियोजन महत्त्वाचे

## पोलीस अधीक्षक जयश्री गायकवाड यांचे प्रतिपादन

**जनप्रवास : कोल्हापूर**

अभ्यासाचे योग्य नियोजन, सातत्य, संदर्भ साहित्याचे सखोल आकलन, वेळेचे व्यवस्थापन आणि मागील वर्षांच्या प्रश्नपत्रिकांचा नियमित सराव हे स्पर्धा परीक्षेतील यशाचे महत्त्वाचे घटक आहेत, असे प्रतिपादन कोल्हापूर परिक्षेत्राच्या गुन्हे अन्वेषण विभागाच्या पोलीस अधीक्षक जयश्री गायकवाड यांनी येथे केले.

शिवाजी विद्यापीठातीलस्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राच्या वतीने स्पर्धा परीक्षा : यशाची गुरूकिल्ली, करिअरच्या सुवर्णसंधी आणि प्रभावी तयारी या विषयावर श्रीमती गायकवाड यांचे विशेष व्याख्यान आयोजित केले होते. त्यावेळी त्या बोलत होत्या.

गायकवाड यांनी स्पर्धा परीक्षेची तयारी करताना आवश्यक असलेल्या विविध बाबींविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. त्या म्हणाल्या, एकाच विषयासाठी अनेक पुस्तके वाचून द्विधा मनःस्थिती करून घेण्यापेक्षा विद्यार्थ्यांनी एकच चांगले पुस्तक निवडून त्याचा सखोल आणि सर्वंकष अभ्यास करणे अधिक उपयुक्त ठरेल. पुस्तके बदलत राहण्यापेक्षा मूलभूत संकल्पना स्पष्ट समजून घेणे आणि त्या आत्मसात करणे यावर अभ्यासाचा भर असला पाहिजे.

त्या म्हणाल्या, पुस्तकाचा अभ्यास पूर्ण झाल्यानंतर मागील वर्षांच्या प्रश्नपत्रिका सोडविणे, त्यांचे विश्लेषण करणे आणि त्यानुसार अभ्यासाची दिशा निश्चित करणे आवश्यक आहे. विद्यार्थिनींना व्यावसायिक आणि वैयक्तिक जीवनात समतोल कसा साधावा,याबाबतही त्यांनी मार्गदर्शन केले. प्रारंभी केंद्राच्या समन्वयक डॉ. कविता वड्राळे यांनी स्वागत व परिचय करून दिला. कार्यक्रमास डॉ. सचिन भोसले, मयुरेश पाटील उपस्थित होते.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रात बोलताना पोलीस अधीक्षक जयश्री गायकवाड. मंचावर डॉ. कविता वड्राळे, डॉ. सचिन भोसले आणि मयुरेश पाटील.**

## विद्यार्थिनी वसतिगृहात सायबर साक्षरतेविषयी मार्गदर्शन

शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थिनी वसतिगृहात पोलीस अधीक्षक जयश्री गायकवाड यांचे 'महिला सुरक्षा व सायबर साक्षरता'या विषयावर विशेष व्याख्यान झाले. दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या सहकार्याने झालेल्या या व्याख्यानाच्या अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. विलास शिंदे होते. यावेळी वसतिगृह अधीक्षक डॉ. माधुरी वाळवेकर, दूरशिक्षण केंद्र संचालक डॉ. प्रतिभा पाटणकर, डॉ. कविता वड्राळे, नीलांबरी जगताप, नगिना माळी यांच्यासह विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 0 AUG 2026

पुण्यनगरी

# प्रत्येक नागरिकाने कायद्याबाबत सजग असावे : पोलीस अधीक्षक जयश्री गायकवाड

**कोल्हापूर :** प्रत्येक नागरिकाला कायद्याचे ज्ञान असणे आवश्यक आहे. बदलत्या काळात नागरिकांनी आपल्या हक्कांसोबतच कर्तव्ये आणि कायद्याबाबत सजग राहणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन गुन्हे अन्वेषण विभागाच्या पोलीस अधीक्षक जयश्री गायकवाड यांनी मंगळवारी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या वतीने आयोजित 'मुक्त संवाद' कार्यक्रमात त्या बोलत होत्या. यावेळी केंद्राच्या संचालक डॉ. प्रतीभा पाटणकर यांच्या हस्ते पोलीस अधीक्षक जयश्री गायकवाड यांचा ग्रंथभेट देऊन सत्कार करण्यात आला.

गायकवाड म्हणाल्या, सायबर गुन्ह्यांचे प्रमाण वाढत आहे. नागरिकांनी आर्थिक फसवणुकीपासून सावध राहणे आवश्यक आहे. सायबर गुन्हे, तसेच आर्थिक फसवणूक रोखण्यासाठी शासनाने केलेल्या कायद्यांची नागरिकांनी माहिती करून घेतली पाहिजे. कोणत्याही प्रकारच्या फसवणुकीला बळी पडू नये, यासाठी कायद्याचे प्राथमिक ज्ञान आणि डिजिटल साक्षरता आवश्यक आहे.

कार्यक्रमात डॉ. सचिन भोसले यांनी स्वागत केले. डॉ. नितीन रणदिवे यांनी आभार मानले. यावेळी उपकुलसचिव विनय शिंदे, विश्वनाथ वरुटे, डॉ. संजय चोपडे, डॉ. केतकी पोवार, डॉ. नगीना माळी, नाझिया मुल्लाणी, प्रियांका सुर्वे, डॉ. प्रकाश बेळीकट्टी, नवनाथ चव्हाण, प्रसाद जाधव आदी उपस्थित होते.

20 AUG 2026

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


# स्पर्धा परीक्षांसाठी अभ्यासाचे नियोजन महत्त्वाचे : जयश्री गायकवाड

## विद्यापीठात व्याख्यान, प्रश्नपत्रिकांचा नियमित सराव हवा

कोल्हापूर, ता. १९ : अभ्यासाचे यो ग्य नियोजन, सातत्य, वेळेचे व्य वस्थापन आणि मागील वर्षांच्या प्रश्नपत्रिकांचा नियमित सराव हे स्पर्धा परीक्षेतील यशाचे महत्त्वाचे घटक आहेत, असे प्रतिपादन कोल्हापूर परिक्षेत्राच्या गुन्हे अन्वेषण विभागाच्या पोलिस अधीक्षक जयश्री गायकवाड यांनी येथे केले.

शिवाजी विद्यापीठातील स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रातर्फे 'स्पर्धा परीक्षा : यशाची गुरुकिल्ली, करिअरच्या सुवर्णसंधी आणि प्रभावी तयारी' या विषयावरील व्याख्यानात गायकवाड बोलत होत्या.

एकाच विषयासाठी अनेक पुस्तके



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील व्याख्यानात बोलताना जयश्री गायकवाड.

वाचून द्विधा मनःस्थिती करून घेण्यापेक्षा विद्यार्थ्यांनी एकच चांगले पुस्तक निवडून त्याचा सखोल अभ्यास करावा. पुस्तके बदलत राहण्यापेक्षा मूलभूत संकल्पना समजून घेणे आणि त्या आत्मसात करण्यावर भर द्यावा. पुस्तकाचा अभ्यास पूर्ण झाल्यानंतर मागील वर्षांच्या प्रश्नपत्रिका सोडविणे, त्यांचे विश्लेषण करणे आवश्यक असल्याचे गायकवाड यांनी सांगितले. केंद्राच्या समन्वयक डॉ. कविता वड्राळे यांनी स्वागत केले. यावेळी डॉ. सचिन भोसले, मयुरेश पाटील उपस्थित होते. दरम्यान, विद्यापीठाच्या विद्यार्थिनी वसतिगृहात गायकवाड यांचे 'महिला सुरक्षा व सायबर साक्षरता' या विषयावर दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या सहकार्याने व्याख्यान झाले. अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे होते. यावेळी डॉ. माधुरी वाळवेकर, प्रतिभा पाटणकर, नीलांबरी जगताप, नगिना माळी उपस्थित होत्या.

2 0 AUG 2026

जनसपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

तरूण भारत



कोल्हापूर : पोलीस अधिक्षक जयश्री गायकवाड यांचा सत्कार करताना डॉ. प्रतिभा पाटणकर सोबत मान्यवर.

# सायबर फसवणुकीला बळी पडू नका

| प्रतिनिधी,कोल्हापूर

■ पोलीस अधिक्षक जयश्री गायकवाड

सायबर गुन्हे तसेच आर्थिक फसवणूक रोखण्यासाठी शासनाने केलेल्या कायद्यांची नागरिकांनी माहिती करून घेतली पाहिजे. कोणत्याही प्रकारच्या फसवणुकीला बळी पडू नये, असे प्रतिपादन गुन्हे अन्वेषण विभागाच्या पोलीस अधीक्षक जयश्री गायकवाड यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या वतीने आयोजित 'मुक्त संवाद" कार्यक्रमात त्या बोलत होत्या. यावेळी केंद्राच्या संचालक डॉ. प्रतीभा पाटणकर यांच्या हस्ते पोलीस अधीक्षक जयश्री गायकवाड यांचा ग्रंथभेट देऊन सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमात डॉ. सचिन भोसले यांनी स्वागत केले. डॉ. नितीन रणदिवे यांनी आभार मानले. यावेळी उपकुलसचिव विनय शिंदे, विश्वनाथ वरुटे, डॉ. संजय चोपडे, डॉ. केतकी पोवार, डॉ. नगीना माळी, नाझिया मुल्लाणी, प्रियांका सुर्वे, डॉ. बेळीकट्टी, नवनाथ चव्हाण, उपस्थित होते.

2 0 AUG 2026

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

## DEPARTMENT OF COMPUTER SCIENCE

Estd 1962
"A++" Accredited by NAAC (2021)
with CGPA 3.52

## COURSES OFFERED

- B.Sc. - M.Sc. (AI & ML) Integrated
- Bachelor of Computer Applications (BCA)
- Master of Computer Applications (MCA)
- M.Sc. Computer Science
- Post Graduate Diploma in Data Science (PGDDS)
- B.Sc. Cyber Security & Digital Forensics

## SALIENT FEATURES

- Hands on Teaching Learning
- Well Qualified Faculty
- Well Equipped Labs
- Invited Talks by Industry Experts

**For Admission Enquiry Contact**
**8805048800**
**8446794922**
**9422785209**
**8055801285**

**Govt. Scholarship Applicable**

## CONTACT DETAILS

**Department of Computer Science**
School of Engineering &
Technology Building,
Shivaji University,
Kolhapur - 416 004

Email : csd@unishivaji.ac.in
Ph. : 0231-2609347



**Dr. V. N. Shinde**
Registrar
Date : 20/08/2026